जिल्हा परिषद,अमरावती
कॅम्प परिसर, कार्यालय पंचायत विभाग अमरावती, ४४४ ६०२
email- mhdyceo@gmail.com

जावक क्रमांक / जिप / अम /पंचायत / मालमत्ता /2434/२०२६ दिनांक :- 96 / ०७ / २०२६

प्रति,

........................................ ,

........................................ .

विषय :- जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत यांच्या मालकीच्या इमारत व इतर खुल्या जागांच्या मालमत्ता नोंदी अद्यावत करणे करीता ऑनलाईन सॉफ्टवेअर तयार करणे बाबत.

संदर्भ :- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे कडून मंजुर टिपणी पान क्र.N-१०
२. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, अमरावती यांचे पत्र क्र./एन.आय.सी./कलि/ कावि-२९/२६ दिनांक ०३/०७/२०२६.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./जिप/अम/पंचायत/मालमत्ता/२२३६/२०२६ दिनांक ०३.०७.२०२६

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत यांच्या मालकीच्या इमारत व इतर खुल्या जागांच्या मालमत्ता नोंदी अद्यावत करणे करीता ऑनलाईन सॉफ्टवेअर तयार करणे बाबत विचाराधीन होते. त्याअनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील एकुण १४ तालुके व त्याअंतर्गत येणा-या ८४१ ग्रामपंचायती मध्ये जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील मालमत्तांचे तथा पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या मालमत्तांचे नोंदींकरीता ऑनलाईन सॉफ्टवेअर तयार करणे करीता सॉफ्टवेअर कंपनीचे प्रेझेंटेशन तथा निवीदा दिनांक २३/०७/२०२६ पर्यंत दुपारी ०२.०० वाजे पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावे. जेणे करून त्याचा विचार करून सदर बाबींचा कंत्राट देऊन तात्काळ कार्यवाही करणे शक्य होईल. प्राप्त निवीदा शक्यतोवर त्याच दिवशी दिनांक २३/०७/२०२६ रोजी दुपारी ०५.०० वाजता अथवा दिनांक २४/०७/२०२६ रोजी सकाळी उघडण्यात येतील.

(टिप :- आपले प्रेझेंटेशन तथा कोटेशनचा विचार करून जिल्हा परिषदेच्या अटी व शर्ती प्रमाणे काम करून घेण्या बाबतचे अधिकार जिल्हा परिषद, अमरावती राखून ठेवते. काम पुर्ण झाल्या शिवाय पुर्ण मानधन अदा करण्यात येणार नाही. तथा काम समाधानकारक न वाटल्यास सॉफ्टवेअर मध्ये आवश्यक बदल करून द्यावा लागेल.)

सहपत्र :- १) जिल्हा परिषद अंतर्गत मालमत्ता सॉफ्टवेअर करीता ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती
२) नमुना कोटेशन प्रत (कोरे)

(बाळासाहेब बायस)
मालमत्ता अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.)
जिल्हा परिषद, अमरावती

प्रतिलिपी:-

१. मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती करीता.
३. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता.
४. श्री. भुषन मेहरे, आय टी सेल, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व कार्यवाही करीता. आपण सदर पत्र जिल्हा परिषद, अमरावती चे पोर्टल वर प्रसिध्द करण्यात यावे.



Scanned with OKEN Scanner

## ❖ जिल्हा परिषद, अमरावती ऑनलाईन सॉफ्टवेअर खरेदीसाठी आवश्यक अटी व शर्ती

जिल्हा परिषद, अमरावती साठी ऑनलाईन मालमत्ता व्यवस्थापन सॉफ्टवेअर खरेदी बाबत

१. प्रस्तावना

जिल्हा परिषद कार्यालयाकरिता मालमत्ता नोंदणी, कर निर्धारण, कर वसुली, अहवाल निर्मिती व संबंधित कामकाज संगणकीकृत पद्धतीने करण्यासाठी Web Based Online Software विकसित करून कार्यान्वित करण्याकरिता पात्र संस्था / कंपनींकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

### तांत्रिक अटी व शर्ती

### १. सॉफ्टवेअर संबंधी अटी

१.१ सदर सॉफ्टवेअर पूर्णतः Web Based, Cloud Enabled व Online प्रणालीवर आधारित असावे.

१.२ सॉफ्टवेअर Marathi Unicode सक्षम असणे बंधनकारक राहील.

१.३ प्रणाली Desktop, Laptop व Mobile मध्ये सुरळीत कार्यरत राहील अशी असावी.

१.४ प्रणालीमध्ये सुरक्षित Login, Password व Role Based Access ची सुविधा असणे आवश्यक राहील.

१.५ प्रणाली SSL Security प्रमाणपत्रासह सुरक्षित असणे आवश्यक राहील.

१.६ प्रणालीमध्ये Audit Log ची सुविधा असणे आवश्यक राहील.

१.७ प्रणालीने आय टी ॲक्ट चे सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

### २. आवश्यक सुविधा / Modules

सॉफ्टवेअरमध्ये किमान खालील सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील :

१. मालमत्ता नोंदणी
२. मालमत्ता वर्गीकरण
३. नमुना ८, PR कार्ड, ७/१२, भुमी अभिलेख यांचे नोंदणीकृत क-प्रत, सर्वे नं., गट नं
४. जागेचे विवरण, मालमत्तेचे विवरण (पक्की इमारत/कच्ची इमारत/टिन शेड)
५. विविध MIS Reports
६. Excel / PDF Export
७. Search व Filter सुविधा
८. Dashboard प्रणाली
९. मोबाईल OTP Verification
१०. GIS/MAP Integration

### ३. डेटा सुरक्षा अटी

१. सदर प्रणालीमधील सर्व डेटा हा संबंधित जिल्हा परिषदेची मालमत्ता राहील.
२. सेवा पुरवठादारास कोणत्याही प्रकारचा डेटा मालकी हक्क राहणार नाही.
३. सेवा पुरवठादाराने डेटा गोपनीयता राखणे बंधनकारक राहील.
४. कोणत्याही तृतीय पक्षास माहिती हस्तांतरित करता येणार नाही.
५. Daily Data Backup घेणे बंधनकारक राहील.
६. आवश्यकतेनुसार Backup प्रत जिल्हा परिषदेस उपलब्ध करून द्यावी लागेल.

### ४. सर्व्हर व Hosting अटी

१. प्रणालीचे Hosting भारतामधील सुरक्षित Data Center वर असणे आवश्यक राहील.
२. प्रणालीची उपलब्धता (Uptime) किमान ९९% राहणे आवश्यक राहील.
३. Server Down / Data Loss झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

### ५. अनुभव व पात्रता

१. संबंधित संस्था / कंपनीला किमान ०३ वर्षांचा अनुभव असावा.
२. शासन / स्थानिक स्वराज्य संस्था / शासकीय कार्यालयामध्ये तत्सम कामाचा अनुभव असणे आवश्यक राहील.
३. संस्था GST नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.
४. PAN, GST, नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.



Scanned with OKEN Scanner

५. मागील ३ वर्षांचे आर्थिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक.

६. प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्य

१. संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
२. User Manual मराठी भाषेत उपलब्ध करून द्यावा लागेल.
३. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी Helpdesk / Support सुविधा उपलब्ध असावी.
४. त्रुटी (Bug) निदर्शनास आल्यानंतर योग्य कालावधीत दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

७. देखभाल (Maintenance)

१. प्रणालीची किमान ०१ वर्ष विनामूल्य देखभाल सेवा देणे आवश्यक राहील.
२. आवश्यक Security Updates व Software Updates विनामूल्य उपलब्ध करून द्यावे लागतील.
३. Technical Support Working Hours मध्ये उपलब्ध असावा.
४. Bug Fixing निश्चित कालावधीत करणे बंधनकारक.

८. डेटा हस्तांतरण व Exit Management

१. करार समाप्तीनंतर संपूर्ण डेटा Excel / CSV / SQL Backup स्वरूपात उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.
२. भविष्यात नवीन प्रणालीमध्ये Data Migration साठी आवश्यक सहकार्य करणे बंधनकारक राहील.

९. दंडात्मक तरतुदी ( Penalty Clause )

१. कामामध्ये विलंब झाल्यास जिल्हा परिषदेस दंड आकारण्याचा अधिकार राहील.
२. सेवा समाधानकारक नसल्यास करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस राहील.
३. डेटा गमावणे, सुरक्षा त्रुटी किंवा गंभीर तांत्रिक दोष आढळल्यास सेवा पुरवठादार जबाबदार राहील.
४. विलंब झाल्यास प्रतिदिन दंड आकारला जाईल.

१०. देयक अटी

१. काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.
२. अंतिम देयकापूर्वी प्रणालीची चाचणी (Testing) व प्रत्यक्ष कार्यान्वयन पूर्ण करणे आवश्यक राहील.
३. आवश्यक असल्यास टप्प्याप्प्याने पेमेंट.
४. GST स्वतंत्र नमुद करणे आवश्यक.

११. करार कालावधी

१. प्रारंभी १ ते ३ वर्षांचा करार.
२. कार्य समाधानकारक असल्यास मुदतवाढ देता येईल.

१२. इतर अटी

१. कोणतेही अतिरिक्त / लपविलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही.
२. प्रणाली भविष्यात विस्तारक्षम (Scalable) असणे आवश्यक राहील.
३. आवश्यकतेनुसार शासन निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
४. API Integration सुविधा असावी.

१२. अधिकार

सर्व अटी व शर्ती स्वीकारणे अथवा कोणताही प्रस्ताव कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहील.

(बाळासाहेब बायस)
मालमत्ता अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा.)
जिल्हा परिषद, अमरावती



Scanned with OKEN Scanner

# Quotation

| Item / अ.क्र. | Particulars / तपशील | | Price/रक्कम |
|---|---|---|---|
| १. | Domain Name Registration | | |
| २. | Hosting Space Charges | | |
| ३. | Software Cost | | |
| ४. | Website Bandwidth | | |
| ५. | SSL Certificate for One Year | | |
| ६. | Sub Total Rs. | | |
| ७. | GST १८% | | |
| ८. | Net Amount | | |
| | AMC After One Year<br>AMC Includes : Domain Renovation/Bandwidth/SSL Charges/ Maintenance Cost | | |
| ९. | AMC for १ Year | | |
| १०. | AMC for ३ Year | | |
| ११. | AMC for ५ Year | | |

Note : ZP Terms and Condition apply.

Along with Quotation- १. Registration Certificate
२. PAN Card
३. Certificate of Incorporation
४. UDYAM Registration Cerfificate
५. Previous ३ Years of Income Tax return filling



Scanned with OKEN Scanner